Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
February-2018
SPECIAL ISSUE-XXXVIII

## CHANGES IN TAX SYSTEM AND INDIAN ECONOMY




Guest Editor :
Dr. Ujjwala Deore
Principal,
Smt. Pushpatai Hiray Arts, Sci. & Comm.
Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp, Dist. Nashik

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar
Dept. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik (MS) India.

Executive Editor : Mr. Mahadev Kshirsagar, Dr. Rajani Sawant & Dr. Meena Patil
Smt. Pushpatai Hiray Arts, Sci. & Comm. Mahila Mahavidyalaya,
Malegaon Camp, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

| | | |
|---|---|---|
| 24 | जी. एस. टी. - फायदे व परिणाम<br>प्रा.उदय टेके | 105 |
| 25 | वस्तू व सेवा कर : एक आर्थिक क्रांती<br>प्रा. महादेव क्षीरसागर | 111 |
| 26 | मुघलकालीन जमीन महसूल पद्धती<br>प्रा. जितेंद्र पगार | 114 |
| 27 | भारतीय अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवा कराची भूमिका<br>प्रा. मनोज देशमुख | 117 |
| 28 | भारताच्या कर प्रणालीतील सुधारणा – जीएसटी<br>डॉ. बी.एम.सोनवणे | 120 |
| 29 | कर व्यवस्थेचे ऐतिहासिक अवलोकन<br>प्रा. विजय मांटे | 123 |
| 30 | वस्तू व सेवा कर : एक दृष्टीक्षेप<br>श्रीमती शिल्पा यन्नावार | 127 |
| 31 | वस्तू व सेवा कर आणि भारतीय अर्थव्यवस्था<br>डॉ. अनिल वाडकर | 130 |
| 32 | वस्तू व सेवा कराचे सामाजिक जीवनावर होणारे परिणाम<br>प्रा. हर्षवर्धन जाधव | 135 |
| 33 | वस्तू व सेवा कर : एक मूल्यमापन<br>प्रा. धनंजय पगारे | 140 |

RESEARCH JOURNEY

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

Published by

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# जीएसटी - फायदे व परिणाम

**प्रा.उदय खंडू टेके**
सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला

**प्रस्तावना**

१ जुलै २०१७ तारखेपासून देशात जीएसटी **(Goods and Service Tax)** कर प्रणाली लागू करण्यात आली.१२२ व्या घटना दुरुस्तीनुसार वस्तू व सेवा कर कायदा (The Goods and Service Tax Act) हे विधेयक मांडण्यात आले व दिनांक २९/०३/२०१७ रोजी संसदेमध्ये मंजुरी मिळाल्यानंतर १ जुलै २०१७ पासून ही करप्रणाली संपूर्ण भारतात लागू करण्यात आली.

सध्या देशात दोन प्रकारचे कर आहेत,एक प्रत्यक्ष कर व दुसरा अप्रत्यक्ष कर. प्रत्यक्ष कर म्हणजे ज्यांची वसुली थेट करदात्यांकडून होते. उदा, प्राप्तीकर किंवा कंपनी कर व अप्रत्यक्ष कर म्हणजे ज्यांची वसुली ग्राहकांच्याकडून अप्रत्यक्षपणे केली जाते. उदा, आयात कर, उत्पादन शुल्क, विक्री कर, सेवा कर, जकात किंवा एलबीटी.जीएसटी हे अप्रत्यक्ष करांच्या रचनेतील महत्वाची सुधारणा आहे याद्वारे सर्व प्रकारच्या करांऐवजी एकच सर्वंकष कर लागू करण्याचा उद्देश आहे.

जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कर.सध्या देशात केंद्र आणि राज्य सरकारांचे 20 हून अधिक कर करदात्याला भरावे लागतात.जीएसटी लागू झाल्यावर या सगळया करांची जागा फक्त एकच कर घेणार आहे तो म्हणजे 'जीएसटी'.जीएसटी लागू झाल्यावर वस्तू आणि सेवांवर लागणारे इतर सर्व कर रद्द होणार आहेत. 'वन नेशन वन टॅक्स' या संकल्पनेवर जीएसटी आधारित आहे.

जी.एस.टी अंतर्गत एक कर केंद्र शासनाद्वारे लावण्यात आलेला आहे ज्याला "केंद्रीय वस्तू आणि सेवाकर" म्हटले जाते आणि दुसरा कर राज्य शासनाद्वारे लावण्यात आलेला आहे ज्याला "राज्य वस्तू आणि सेवाकर" म्हटले जाते.पूर्वीच्या करपद्धतीपेक्षा हा कर गंतव्यस्थानावर (Destination Base) आधारित आहे. म्हणजे जी शहरे किंवा राज्ये जास्त वस्तू व सेवा यांचा उपभोग घेतील त्यांना त्या प्रमाणात करापासुनचे उत्पन्न मिळेल.

**पार्श्वभूमी**

भारतातील वर्तमान करव्यवस्था खुपच गुंतागुंतीची आहे.भारतीय संविधानानुसार वस्तूच्या विक्रीवर कर आकारण्याचा अधिकार राज्य शासनास व वस्तूचे उत्पादन व सेवावर कर आकारण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे.राज्यशासन सुद्धा त्यांच्या अधिकार क्षेत्रात वेगवेगळे कर आकारते परिणामी करांची संख्या वाढून अशी करव्यवस्था अतिशय गुंतागुंतीची बनते.व्यावसायिकांना वेगवेगळया कर कायद्याचे पालन करणे जिकीरीचे बनते. हे कर अदा केल्यानंतर विक्रीकराचा इनपुट क्रेडीट (खरेदी केलेल्या मालावर अदा केलेला विक्रीकर) मिळत नाही तसेच सेवा कर व उत्पादन शुल्कचे क्रेडीट सुद्धा मिळत नाही म्हणजेच या करव्यवस्थेत करावर कर आकाराला जातो परिणामी वस्तूच्या किमती वाढतात. जी.एस.टी.मुळे व्यवसायिकांना खरेदी केलेल्या वस्तूवर व सेवावर दिलेल्या जी.एस.टी.चे क्रेडीट मिळेल त्याचा उपयोग विक्री केलेल्या वस्तू व सेवावर लावलेला जी.एस.टी.अदा करताना होईल.जी.एस.टी.मुळे संपूर्ण देशात एकच अप्रत्यक्ष कर असेल.

**जीएसटीची वैशिष्ट्ये**

Central Board of Excise and Custom Duty (CBEC) ने नमूद केलेली जीएसटीची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.



Scanned by CamScanner

1. विक्रीकर वस्तू व सेवेच्या उत्पादनावर आकारला जातो,जीएसटी मात्र उत्पादन वा सेवेच्या पुरवठ्यावरच आकारला जाईल.
2. सध्याचे कर Origin Base कर आहेत, जीएसटी मात्र Destination Base कर आहे.
3. सेंट्रल जीएसटी आणि स्टेट जीएसटी केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी ठरवलेल्या सामाईक दरावर आकारला जाईल.
4. **जीएसटीमुळे पुढील केंद्रस्तरीय कर संपुष्टात येतील-** केंद्रीय करातील केंद्रीय अवकारी कर, अतिरिक्त अवकारी शुल्क, विशेष अतिरिक्त सीमा शुल्क, मेडिसिनल अँड टॉयलेट प्रिपरेशन (एक्साइज डयूटी) ॲक्ट १९५५, सेवा कर, अतिरिक्त सीमा शुल्क, केंद्रीय अधिभार व उपकर हे सर्व कर जीएसटीमुळे राहणार नाहीत.
5. **जीएसटीमुळे पुढील राज्यस्तरीय कर संपुष्टात येतील-** राज्यांचे मूल्यवर्धित कर, विक्री कर, लॉटरी, जुगार व सट्टेबाजीवरील कर, करमणूक कर ( स्थानिक संस्था कर वगळता), राज्याचे उपकर, अधिभार, चैनीच्या वस्तूंवरील कर, खरेदी कर, जकात व प्रवेश कर हे सर्व कर राहणार नाहीत.
6. सेंट्रल जीएसटी आणि स्टेट जीएसटी या दोन्हींसाठी दोन स्वतंत्र प्रकारच्या क्रेडिट सिस्टम तयार केल्या आहेत.
7. जीएसटी हा सर्व प्रकारच्या वस्तू व सेवांवर आकारला जाईल. फक्त काही विशेष नमूद केलेल्या वस्तू व सेवा त्यातून वगळलेल्या आहेत.(विदेशातून येणाऱ्या वस्तू व सेवांवरील आयात कर (सीमाशुल्क) कायम असेल. पेट्रोलियम उत्पादने, मद्य, तंबाखू आणि वीज करआकारणी जीएसटीतून वगळण्यात आले आहे. कृषीउत्पन्न बाजार समिती करही जीएसटीच्या कक्षेतून वगळण्यात आला आहे.)
8. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ यावर जीएसटीव्यतिरिक्त सेंट्रल एक्साइज ड्युटी व राज्यविक्री कर/व्हॅट आकारला जाईल.
9. सध्याच्या करप्रणालीतून वगळलेले छोटे व्यापारी जीएसटीमधून वगळले जातील.
10. करप्रणालीतून वगळण्यात येणाऱ्या वस्तू व सेवांची यादी कमीत कमी करण्यात येणार आहे.
11. निर्यातीवर जीएसटी आकारला जाणार नाही.
12. इंटर स्टेट जीएसटी हा केंद्र सरकारकडे जमा केला जाईल. त्यानंतर केंद्र सरकारकडून तो संबंधित राज्यांकडे ट्रान्सफर केला जाईल.
13. आयात केलेल्या वस्तू व सेवा आंतरराज्यीय म्हणून हाताळल्या जातील व त्यावर आयजीएसटीसोबत कस्टम ड्युटी आकारली जाईल.

**जी.एस.टी.- फायदे**

1. जी.एस.टी.करप्रणाली पारदर्शक असून,अप्रत्यक्ष कर अस्तित्वात असणार नाही. म्हणजेच अप्रत्यक्ष कर शून्यावर येतो. विक्रीच्या इनव्हॉईसवर म्हणजे वस्तुविशेषावर वस्तू-सेवाकराची नोंद असेल. म्हणजे ग्राहकाने दिलेला कर कशासाठी दिलेला आहे. कोणत्या सेवेसाठी दिलेला आहे की, वस्तू खरेदीसाठी दिलेला आहे तो नक्की किती दिला आहे, वस्तूची मूळ किंमत किती आणि वस्तू सेवाकर किती, याचा पूर्ण तपशील स्पष्टपणे समजेल.
2. नोंदणीकृत व्यापा-यांना जी.एस.टी.ची वेगळी किंमत मोजावी लागणार नाही. त्यामुळे छुपे कर दडून राहणार नाहीत. व्यवसाय करण्याचा खर्च कमी होईल. याचा फायदा निर्यात अधिक स्पर्धात्मक होण्यात होईल.



Scanned by CamScanner

3. जी.एस.टी. प्रणालीत उत्पादन क्षेत्र व सेवा यांच्यात कराचा बोजा समान वाटला जाईल. कराचा पाया विस्तारित करून तसेच सवलती कमी करून हे साध्य करता येईल.
4. केंद्राचा वस्तू-सेवा कर आणि राज्यांचा वस्तू-सेवाकर याच्यावर उत्पादन खर्चावर कर लावला जाईल आणि विक्रीच्या ठिकाणी तो वसूल केला जाईल. त्यामुळे वस्तूच्या किमती कमी होऊन ग्राहकाचे उपभोगाचे प्रमाण वाढेल. त्यामुळे उत्पादकांना व्यापक बाजारपेठेत प्रवेश करता येईल.
5. जकात, केंद्रीय विक्रीकर, राज्याचा विक्रीकर, प्रवेशकर, परवाना शुल्क, उलाढालकर असे विविध कर संपुष्टात येतील. त्यामुळे उद्योजकाला व्यवसाय करणे जास्त सोपे जाईल.कारकुनी काम कमी होईल.छुपे कर नसल्यामुळे व्यावसायिकाला त्याचा व्यवसाय करणे अधिक सोपे वाटेल.
6. ज्या वस्तू व सेवांवर सध्या ३० ते ४० टक्के कर आहे त्या स्वस्त होतील. कारण वस्तू- सेवाकराची मर्यादा जास्तीत जास्त १८ टक्के ठेवण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकपयोगी बहुतांश वस्तू स्वस्त होतील.
7. एखाद्या वस्तूची किंमत कमी झाल्यास त्याचा फायदा ग्राहकांना दिला जातो की नाही हे पाहण्यासाठी ऍन्टी प्रॉफिटरिंग कमिटी आहे. ज्यामुळे ग्राहकांचे हक्क अबाधित राहण्यास मदत होणार आहे.
8. जी.एस.टी.लागू झाल्यामुळे टॅक्स चोरीला आळा बसेल. त्याचा परिणाम जी.डी.पी.च्या वाढीमध्ये दिसून येईल.भारतात २० पेक्षा जास्त वेगवेगळे कर आकारले जातात जी.एस.टी.मुळे हे सर्व कर नष्ट होऊन एकाच कर येईल परिणामी कर भरण्यात कोणतीही कुचराई होणार नाही.

**परिणाम**

**जीएसटी आणि रिअल इस्टेट**

सध्या घर घेताना विकासकाकडून सेवा कर, व्हॅट व मुद्रांक शुल्क अशा करांची आकारणी करण्यात येते. हे तीनही कर एकत्रित करून ग्राहकाला एकूण रकमेच्या ९.५ ते १० टक्के इतका कर भरावा लागतो. मात्र जीएसटी लागू झाल्यावर हे सर्व कर बाद होऊन मुद्रांक शुल्काव्यतिरिक्त एकच करप्रणाली असणार आहे. जीएसटीअंतर्गत स्थावर मालमत्ता क्षेत्रासाठी १२ टक्के कर असणार आहे. जीएसटीनंतर राज्यांकडून लावले जाणारे मुद्रांक शुल्क ५ ते ८ टक्के असेल, ज्याचा थेट भार घर खरेदी ग्राहकावर पडणार आहे. तसेच कुठलाही व्यवहार करताना प्रत्येकावर कर द्यावा लागणार असल्याने स्थावर मालमत्तांच्या किमतीही वाढतील. जीएसटी लागू झाल्यावर अप्रत्यक्षपणे एकच करप्रणाली असणार असली, तरी राज्यांकडून मुद्रांक शुल्क आकारला जाणार आहे. त्यामुळे याचा परिणाम थेट ग्राहकांवर व परिणामी विकासकांवरही होणार आहे.केंद्र व राज्य सरकारकडून तयार घरे व बांधकामांवर १२ टक्के जीएसटी लागू होणार आहे, त्यामुळे घरांच्या किमतीत ५ टक्क्यांची घट येईल, असा अंदाज बांधकाम व्यावसायिक व्यक्त करतात.बांधकाम व्यावसायिकांना इनपुट क्रेडिट लाभ मिळणार आहे. विकासक इनपुट क्रेडिटमधून मिळणारा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवून किमती कमी करू शकतात.

**जीएसटी आणि शेती-उद्योग**

असंख्य परवाने, परवानग्या, राज्यांकडून आकारल्या जाणाऱ्या विविध करांमुळे शेतमालाची बाजारपेठ सध्या संकुचित झाली आहे,त्यामुळे शेतमालाला कमी भाव मिळतो.जी.एस.टी.नंतर राज्या-राज्यांतील वाहतुकीतील अडथळे दूर झाल्याने शेतमालासाठी प्रथमच राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण होणार आहे. भाजीपाला, फळे, फुले इ. नाशवंत वस्तूंची दूरवर जलद वाहतूक करणे शक्य होणार आहे. शिवाय वाहतूक खर्चात ३-५ टक्के घट होण्याचा अंदाज आहे. शेतमालाच्या सुलभ जलद हालचालीतून स्पर्धात्मक बाजारपेठ निर्माण व्हावी, बाजारपेठ पारदर्शकता यावी म्हणून केंद्र सरकारने अलीकडेच 'नाम'ची



Scanned by CamScanner

(National Agriculture Market) निर्मिती केली आहे. नाम केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना मानली जाते. या योजनेनुसार देशभरातील बाजार समित्यांतील व्यापारी, शेतकऱ्यांना केंद्र सरकारने विकसित केलेल्या विशेष प्रवेशद्वारे (Portal) ई-कॉमर्सच्या एकाच व्यासपीठावर आणून शेतमालाची सामायिक, राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण केली जाईल. जी.एस.टी. व नामची उद्दिष्टये समान असल्याने ते एकमेकाला पूरक आहेत. सध्याच्या राज्या-राज्यांतील मूल्यवर्धित कराच्या भिन्न दरांमुळे नामच्या अमंलबजावणीत अडथळे येत होते. जी.एस.टी.मुळे हे अडथळे दूर होण्यास मदत होणार आहे.

नाम व जीएसटीमुळे शेतमालासाठी राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाली तरी सामान्य शेतकऱ्याला त्याचा लाभ होणे तसे कठीणच आहे. बड्या व्यापाऱ्यांसाठी मात्र ही व्यवस्था लाभकारक आहे. विक्रेय मालाचे प्रमाण कमी असल्याने दूरच्या बाजारपेठेत माल विकण्याच्या भानगडीत सामान्य शेतकरी पडत नाही. विद्यमान विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करणे, गैरप्रकारांना आळा घालणे, बाजारपेठेत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, शेतमालाच्या विक्रीनंतर पैसे लगेच मिळण्याची व्यवस्था करणे, हे सामान्य शेतकऱ्याच्या दृष्टीने अधिक लाभकारक ठरू शकते.

जीएसटीमुळे शेतमालावरील करदरात वाढ होणार आहे (खतावरील कर १२%,ट्रॅक्टरवर कर १२%,दुग्धोत्पादानावरील कर १८ % ई.)परिणामी शेतमालाच्या किमती वाढणार असल्याने अन्न भाववाढीचा धोका व्यक्त केला जातो. १३व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. विजय केळकर यांनीच ही शक्यता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते भाववाढीचा दर ०.६१ ते १.१८ टक्के एवढा सौम्य असेल, परंतु प्रत्यक्षात हा दर अधिक राहण्याची शक्यता आहे. जी.एस.टी.मुळे शेतमालाच्या किमती वाढल्याने शेती-उद्योग व्यापार शर्ती शेतीला अनुकूल बनल्याने शेतकऱ्यांचा फायदा होईल असा दावा काही अभ्यासकांकडून केला जातो. शेतमालाच्या वाढलेल्या किमतींचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्यानंतरच हे शक्य आहे. परंतु व्यापारी, दलाल, मध्यस्थ हा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू देतील ही शक्यता तशी दुर्मिळ.जी.एस.टी. आल्यानंतर ही शासकीय अनुदाने पूर्वीप्रमाणे दिली जातील. परंतु जी.एस.टी.मुळे शेती आदानांवरील (खते, अवजारे इ.) करात वाढ झाल्याने शेतमालाच्या उत्पादन खर्चात वाढ होणार आहे.

**जीएसटी आणि औद्योगिक क्षेत्र**

जीएसटीमुळे भारतातील संपूर्ण अप्रत्यक्ष करप्रणाली बदलली जाईल. सध्याच्या जटिल असलेल्या करप्रणालीमुळे व्यवसाय व व्यापार करताना उद्योजकांना अनेक प्रकारचे त्रास सोसावे लागतात; विशेषत: व्यापार दोन किंवा अधिक राज्यांमध्ये होत असेल तर. जीएसटीमुळे अशा प्रकारचे त्रास कमी होण्यास मदत होईल. या सुधारणा कायद्यामुळे शासकीय कारभारातील कार्यक्षमता वाढेल, करगळती कमी होईल व एकूणच करसंकलन वाढेल. संपूर्ण देशभरात एकच कर आकारला गेल्यामुळे वस्तू व सेवांचा उत्पादन खर्च नियंत्रणात ठेवणे अधिक सुलभ होईल. जीएसटीमुळे देशातील पुरवठा साखळी सुधारण्यास मदत होईल, तसेच पुरवठा करण्यात येणाऱ्या अडचणी कमी करता येईल. जीएसटीमुळे वस्तू व सेवा यांच्यात समान कर आकारला जाईल, त्यामुळे कराचा भार हा सर्वच उद्योजकांवर समान राहील, तसेच टॅक्स बेस म्हणजेच एकूण कर भरण्याच्या संख्येत वाढ होईल. टॅक्स बेस वाढल्यामुळे व शासकीय कार्यक्षमता वाढल्यामुळे भविष्यात कराचा दर कमी होण्यास मदत होईल. गंतव्यस्थानावर आधारित (Destination Base) असल्यामुळे करात होणारी गळती अधिक प्रमाणात कमी करता येईल. जीएसटीमुळे देशभरात एक सामाईक बाजारपेठ तयार होईल ज्यामुळे व्यापाराला चालना मिळेल, Compliance Cost कमी होईल तसेच निर्यात वाढेल. समान कर असल्यामुळे व्यापाराबद्दलचे निर्णय संपूर्णत: आर्थिक मुद्द्यावर घेण्यात येतील. जीएसटीमुळे व्यवसाय करणे सुलभ (Ease of Doing Business) होईल. एकूणच जीएसटी आल्यामुळे करप्रणालीत पारदर्शकता येईल व त्याचा थेट फायदा उद्योजकांना होईल.



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018



अर्थविश्लेषकांच्या प्राथमिक अंदाजानुसार, देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात किमान एक टक्क्याची भर घालणारे परिवर्तन केवळ या नवीन करप्रणालीतून घडून येईल. आगामी २० ते ३० वर्षात ८ ते ९ टक्क्याने आर्थिक विकास गाठणे शक्य होईल. परिणामी आथिक व्यवहाराचे प्रमाण वाढून कृषी व बिगर कृषी क्षेत्रातील रोजगारात २० लाखांनी भर पडेल, असा अंदाज व्यक्त केला जातो.कर व करदरातील घटीमुळे उद्योगांचा उत्पादन खर्च घटल्याने उत्पादित वस्तूंची निर्यात वाढू शकते.जी.एस.टी.व चलन बदलीचा परिणाम म्हणून अनोंदित व्यवहार कमी होतील अथवा सगळे व्यवहार नोंदणीकृत होतील त्यामुळे कर उत्पन्न वाढेल काळ्या पैशावर आधारित व्यवस्था कमी होईल.वाढलेल्या कर उत्पन्नातून पायाभूत सुविधा व सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी निधी प्राप्त होईल,आरोग्य,शिक्षण,रस्ते,रेल्वे या सुविधावर खर्च वाढून त्याचा दर्जा सुधारेल.जी.एस.टी.तील इनपुट क्रेडीटमुळे वस्तूच्या किमती कमी होऊन हळू हळू महागाई कमी होईल.

जीएसटीमुळे कर-प्रशासनात सुलभता येईल त्याचा परिणाम थेट विदेशी गुंतवणुक व आंतरराज्य व्यापार वाढण्यावर होईल. देशात व्यापार, वाणिज्य, दळणवळण विनाअडथळा सारख्याच स्वरूपात करण्याचे स्वातंत्र्य मिळेल.जीएसटीतून साधल्या जाणाऱ्या सुलभीकरणाने व्यापारी-उद्योजकांमधील करचोरीला आळा बसेल. यात एकूण करआकारणीचे प्रमाण कमी असले तरी अधिकाधिक लोकांकडून कर भरला गेल्याने एकंदर कर महसूल वाढणे अपेक्षित आहे.

**समारोप**

स्वातंत्र्योत्तर काळातील काही महत्वाच्या धोरणात्मक निर्णयातील हा एक महत्वपूर्ण निर्णय म्हणून जी.एस.टी.चा उल्लेख केला जातो. अर्थ विश्लेपकांच्या मतानुसार जी.एस.टी.करप्रणाली ही दुरगामी परिणाम करणारी करसुधारणा म्हणून विचारत घेतली पाहिजे.या कर सुधारणा निर्णयाच्या मागील हेतू साध्यतेसाठी काही वर्षांचा कालावधी जावा लागणार आहे.आज जगातील १५० पेक्षा जास्त देशात जी.एस.टी.करप्रणाली राबवली जाते व त्यांना त्यातून अपेक्षित फलनिष्पत्ती नक्कीच मिळालेली आहे. निर्णय घेतल्या नंतरच्या सहा महिन्यातच यातील बऱ्याच वस्तुवरचे कर दर बदलावे लागलेले आहेत.या करव्यवस्थेत मोठ्या संख्येने (३६ पेक्षा जास्त) रिटर्न्स भरावे लागत आहेत व्यापाऱ्यांना हे जिकीरीचे ठरत आहे.अभ्यासक/अर्थविश्लेषक यांच्या निष्कर्षानुसार ग्राहक,उद्योजक,शेतकरी,व्यापारी व एकूण अर्थव्यवस्थेला पोषक अशीच ही करव्यवस्था आहे.

**संदर्भ:-**

१. माझा पेपर दि.१३/०३/२०१२ अशी असेल वस्तू आणि सेवा कर प्रणाली( जी एस टी)
२. दै.लोकसत्ता दि.०७/०५/२०१५- वस्तू व सेवा कर विधेयक म्हणजे काय?- राजेंद्र येवलेकर
३. दै.लोकसत्ता दि.२४/०७/२०१६ - 'जीएसटी' म्हणजे काय रे भाऊ?- सचिन रोहेकर
४. दै.लोकमत दि.०४/०८/२०१६ जीएसटी म्हणजे काय? जाणून घ्या फायदे - तोटे...
५. दै.प्रहार दि.२९/०८/२०१६ काय आहे जी.एस.टी..?
६. दै.सामना दि.३१/०५/२०१७ जीएसटीचा शेतीसाठी किती उपयोग? **प्रा. सुभाष बागल**
७. दै.लोकसत्ता दि.०३/०६/२०१७-जीएसटी आणि रिअल इस्टेट - स्वाती चिकणे
८. दै.सकाळ दि.२६/०६/२०१७ आला रे आला, "जीएसटी" आला
९. दै.लोकमत दि.२८/०६/२०१७- जीएसटी म्हणजे काय रे भाऊ? सोनाली देशपांडे
१०. दै.लोकसत्ता दि.३०/०६/२०१७-जीएसटी: चला नियमांचे पालन करू या - आशीष थत्ते



Scanned by CamScanner